# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

## प्रकटन

**विषयः- विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी लेखनिक/वाचक उपलब्धतेबाबत**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळमार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/ मुंबई/ कोल्हापूर/ अमरावती/ नाशिक/ लातूर/ कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आयोजित केली जाते.

इ.१ ते इ.१२ वी पर्यतच्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मूल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलती सदंर्भात मार्गदर्शक सूचनांचा शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/(११८/१७)/एस.डी.६ दिनांक १६ ऑक्टोबर २०१८ निर्गमित करण्यात आला आहे.

लेखनिक व वाचक यासाठी प्रपत्र- ब मध्ये क्र.१ ते १० नुसार मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यामधील क्र.२.४ दिव्यांग विद्यार्थ्यांना मागील इयत्तेचा विद्यार्थी अथवा प्रौढ लेखनिक म्हणून नेमून देण्याचे अधिकार संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना राहतील. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या असलेल्या अडचणी व गरज याबद्दलची जाणीव संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना असल्याने हे अधिकार त्यांना राहतील अशी तरतूद आहे. तसेच मुद्या क्र.३ नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखनिक देणेकरिता शिफारस देण्याची जबाबदारी व त्याची पध्दत याबाबत सूचना आहेत.

तरी शासन निर्णयातील निर्धारित सुविधेपासून कोणताही दिव्यांग विद्यार्थी वंचित राहणार नाही याची कटाक्षाने दक्षता सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी घ्यावी.

**शासन निर्णयानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे कार्यालयाने लेखनिक / वाचक बँक तयार करण्यासाठी** http://www.research.net/r/readerwriterbank **ही लिंक उपलब्ध करुन दिली असून यामध्ये नाव नोंदणी करण्यासाठी दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यत मुदत दिली आहे.**

तसेच एप्रिल–मे २०२१ च्या परीक्षेपासून सदर परीक्षेतील विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विभागीय मंडळ स्तरावर लेखनिक व वाचक उपलब्धतेबाबत येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यानुसार विभागीय मंडळ निहाय संबंधित कार्यालयातील सहसचिव/सहा.सचिव संबंधितांना हेल्पलाईनव्दारे मार्गदर्शन करणार आहेत यांचे भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | विभागीय मंडळाचे नाव | विभागीय सहसचिव/सहा.सचिव यांचे नाव | भ्रमणध्वनी क्रमांक | ई–मेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे | श्रीम.प्रिया शिंदे, सहसचिव<br>श्रीम.संगिता शिंदे, सहा.सचिव | 9689192899<br>8888339530 | sscboardpune@gmail.com |
| २ | नागपूर | श्रीम.माधुरी सावरकर, सचिव (प्र.) तथा सहसचिव<br>श्री.व्ही.एच.जोग, सहा.सचिव | 9403614142<br>9890514839 | msboardnagpur@gmail.com |
| ३ | मुंबई | श्री.मुश्ताक शेख, सहसचिव<br>श्री.गिरीधर भोज, सहा.सचिव (प्र.) | 7020014714<br>7058595664 | sschsc.mumbaiboard@gmail.com |
| ४ | औरंगाबाद | श्री.राजेंद्र पाटील, सहसचिव<br>श्री.एन.वाय. बनसोडे, सहा.सचिव (प्र.) | 9922900825<br>9421336801 | chair.aurboard@mahedu.gov.in |
| ५ | अमरावती | श्रीम.जयश्री राऊत, सहा.सचिव | 9960909347 | divsecamt@rediffmail.com |
| ६ | कोल्हापूर | श्री.देविदास कुलाळ, सचिव (प्र.) तथा सहसचिव<br>श्रीम.सुवर्णा सावंत, सहा.सचिव | 7588636301<br>8007597071 | divsec.kop@gmail.com |
| ७ | नाशिक | श्रीम. एम.यु.देवकर, सहा.सचिव (प्र.) | 8888339423<br>7755903427 | nsksec@rediffmail.com |
| ८ | लातूर | श्री.संजय पंचगल्ले, सहा.सचिव | 9421694282 | divsecretarylatur@gmail.com |
| ९ | कोकण | श्रीम.भावना राजनोर, सहसचिव | 8806512288 | divchairman.konkan@gmail.com |

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे- ०४

क्र.कोविमं/इ.१२वी परीक्षा/7350
कोल्हापूर ४१६००४
दिनांक ०२/०३/२०२१

प्रति,
सर्व
मान्यताप्राप्त शाळा, कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर

इ.१०वी, १२वी एप्रिल-मे २०२१ परीक्षेसाठी विशेष गरजा (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठी लेखनिक/वाचक उपलब्धतेसंदर्भात हेल्पलाईन सुविधेबाबत वरीलप्रमाणे प्रकटनाची नोंद घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
म.रा.माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर–४१६००४.